अवनी

# माझं आवडतं पुस्तक

पुस्तकं वाचायला मला खूप, खूप आवडतं.
मला मेरी पॉप ऑसबर्न ची 'मॅजिक ट्री हाऊस' आणि रॉन रॉय ची 'ए टु झेड मिस्ट्रीज' आवडतात.

मराठी मधली 'चिंटू' ची 'खट्याळ चिंटू' आणि 'अफलातुन चिंटू' ही पुस्तकं खूप मजेदार आहेत. चिंटू, पप्पू, बगळ्या, मिनी, राजू, नेहा, जोशी काकू सगळे मिळुन धमाल मस्ती करतात आणि मला खूप हसवतात. मी माझ्या भावांवर जेव्हा चिडते तेव्हा ते म्हणतात 'तू मिनी सारखीच चिडतेस'.

मला आवडणारं अजुन एक मजेदार पुस्तक म्हणजे दिलीप प्रभावळकरांचं 'बोक्या सातबंडे'. बोक्या खूप उद्योगी आणि हुशार असतो.

बोक्या च्या पुस्तकामुळे मला खूप नवीन-नवीन शब्द कळले. त्यातले 'हडापेरानी मजबूत' आणि 'गुप्त खजिना' या शब्दांची मला मजा वाटली. मी बरेचदा झोपताना 'बोक्या सातबंडे' पुस्तक वाचते.

आई कडे 'तोत्तोचान' नावाचं जपानी पुस्तक आहे. 'तोत्तोचान' लिहिणारी 'कुरोयानागी तेत्सुको' ही आजी बरेचदा टी.वी वरच्या कार्यक्रमात असते. म्हणुन मला पण तिच्या गोष्टी वाचाव्याशा वाटल्या. मग आईनी मला तिच्याकडचं मराठी तोत्तोचान दिलं. तोत्तोचान सारखी ट्रेनच्या डब्यातली शाळा मला पण हवी असं वाटतं. मला त्यातल्या अजून आवडलेल्या गोष्टी म्हणजे जेवणाच्या डब्यातलं 'समुद्रातलं आणि डोंगरावरचं' खाणं.

त्यांचं जेवणाच्या आधी म्हणण्याचं गाणं वगैरे. पण मला ह्या पुस्तका मधली अजिबात न आवडलेली गोष्ट म्हणजे तोत्तोचान चा मित्र, यासुकी-चान देवाघरी गेला. ते वाचताना मला नेहमी रडू येतं.

खरं म्हणजे मला 'टिंकल कॉमिक' वाचायला सगळ्यात जास्तं आवडतं. माझ्या एका मावशी नी मला तिच्याकडची खूप 'टिंकल' दिल्येत. पण त्यातली अक्षरं खूप छोटी-छोटी असल्या मुळे ते जास्त वेळ वाचलं तर चष्मा लागेल म्हणून आई मला ओरडते. म्हणून मी ठरवलय की मोठी आल्यावर खूप वेळ टिंकल वाचीन.

धन्यवाद